शाहुपूरी पोलीस ठाणे
आकाशवाणी केंद्र जवळ,
शाहूपूरी,ता.जि.सातारा
फोन नं- (02162)- 252333, **पिन कोड नं-** 41500
ई मेल id - pishahupri.satara@mahapolice.gov.in

शाहुपूरी पोलीस ठाणे	**दि.** 12/09/2026

प्रेस नोट

शाहूपुरी पोलीस ठाणे हद्दीत दि.7/09/2026 रोजी 19.00 वा ते 22.00 या वेळेत राजवाडा गांधी मैदान सातारा येथे आयोजक यश अजय सावंत रा मल्हारपेठ ता जि सातारा यांनी दहिहंडी कार्यक्रमाचे निमित्ताने प्रसिद्ध गायक(RAPER)संबाटा यांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रम अनुषंगाने आयोजक यश अजय सावंत यांना पोलिस ठाणे कडून प्रचलित नियमाचे अधीन राहून कार्यक्रम करण्यास परवानगी देनेत आली होती तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 168 प्रमाणे नोटीस देण्यात आली होती.

परंतु सदर कार्यक्रमाचे आयोजक व त्यांचे साथीदार यांनी दिले सुचनांचे,आदेशाचे पालन केले नाही त्यांनी मोठया आवाजात डीजे साऊंड सिस्टीम लावून सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करुन, सार्वजनिक रस्त्यावर पादचारी व वाहनधारक यांना येणे जाणेस अटकाव होईल अश्या प्रकारे स्टेज लावुन मा.पोलीस अधीक्षक सो यांचे दिनांक जि.वि.शा./7/गणेशउत्सव/बी.एन.एस.एस. 163/लेझर बंदी आदेश /2026 -7122 सातारा दि.3/9/2026 आदेशाचे उल्लघंन करुन स्टेजवर मर्यादेपेक्षा जास्त लोक चढवुन बेकायदेशीर जमाव जमवला तसेच स्टेजवर जाण्याचे कारणावरुन आयोजक व जमलेल्या कार्यकर्त्यांनी ठरवुन ऐकमेकांना हाताने ,लाथाबुक्यांनी मारहाण करुन दोन गटांत वाद निर्माण करुन गर्दी व मारामारी केली. म्हणुन वगैरे मजकुरचे खबरीवरुन शाहूपुरी पोलीस ठाणेस दिपक लक्ष्मण पोळ वय-46वर्षे, पोलीस हवालदार ब नं 1858 नेमणुक-शाहुपुरी पोलीस ठाणे यांनी गु.रजि.नं.285/2026 भारतीय न्यायसंहिता 2023 चे कलम 223,292, 293,189(2),191(2),115(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची कारवाई मा.श्री.निखिल पिंगळे,पोलीस अधीक्षक सो सातारा श्रीमती.वैशाली कडूकर मा.अपर पोलीस अधीक्षक सो सातारा., श्री. विपुल पाटील मा-उपविभागीय पोलीस अधीकारी सातारा विभाग

सातारा, श्री.संग्राम शेवाळे सो. पोलीस निरीक्षक शाहूपुरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.नीलेश तांबे सो. पोलीस निरीक्षक शाहूपुरी पोलीस ठाणे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती प्रियंका बाबर सो. शाहूपुरी पोलीस ठाणे सातारा,पोलिस उप निरीक्षक बागवान व पो. हवा. अब्दुल खलिफा,महेश बोडरे गोपनीय विभागाचे पो.हवा. दिपक पोळ व पो.हवा. अमोल साळुंखे आणि पो.कॉ.शुभम चव्हाण DB पथकाचे पो.हवा सुरेश घोडके,महेश बनकर,मनोज मदणे पो.कॉ.अभय साबळे,सुमित मोरे, संग्राम फडतरे, सुहास वाघ,रवी मारबदे यांनी केली आहे तरी सातारा व शाहूपुरी पोलीस ठाणे हद्दीतील विविध कार्यक्रमाचे आयोजक यांना सुचीत करण्यात येते की कार्यक्रमाचे ठिकाणी स्पीकर चे आवाज मर्यादित ठेवावा ध्वनि प्रदूषणाचे नियमचे काटेकोर पने अमलबजावणी करावी कार्यक्रमाचे ठिकाणी येणाऱ्या लोकांचे गर्दीचे योग्य व्यवस्थापन करावे व कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता पुरेसे स्वयंम सेवक नेमण्यात यावे.

आरोपी नावे -

1)यश अजय सावंत रा मल्हारपेठ ता जि सातारा

2)मयुर राजेंद्र जाधव रा कोडोली ता जि सातारा

3)सौरभ उर्फ कुकया कैलास खरात

4)धिरज विजय शेळके

5)संग्राम हरिचंद्र दणाणे

6) तुषार प्रल्हाद धोत्रे

7)अनिकेत पवार

8)इतर 10 ते 12 अनोळखी इसम नाव पत्ता माहीत नाही (सर्व रा सातारा)

9) डिजे मालक चालक उदय गोविंद बर्गे रा चिंचणेर ता जि सातारा

पोलीस निरीक्षक
शाहूपुरी पोलीस ठाणे

प्रती,
सर्व पत्रकार व संपादक बंधू
सातारा जिल्हा